दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/वैद्यकीय/६७३/2020-21 दिनांक : 05/06/2020

**संदर्भ** – १. भारतीय साथरोग प्रतिबंधक अधिनियम, १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५.
३. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२०
४. महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन लॉकडाऊन वेळोवेळी आदेश DMU/2020/CR.92/DisM-1, DATED - 17/04/2020.
५. GOI, Ministry of Home Affairs, Dated - 30/05/2020.
६. DMU/2020/CR.92/DisM-1, DATED - 31/05/2020 & 04/06/2020.

## // आदेश //

ज्याअर्थी, संपूर्ण जगात कोरोना साथरोगाने चिंतेचे वातावरण निर्माण केले असून, कोविड-१९ या रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८७९, दि. १३/०३/२०२० पासून लागू करण्याबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे, आणि,

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० नियम क्र.३ अन्वये महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करुन त्यांना कोविड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत, त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे, आणि उक्त नियमाखालील नियम १० अन्वये आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे अधिकार आयुक्तांना निहीत करण्यात आले आहेत, आणि त्यानुसार उक्त संदर्भान्वये शासनाने व महानगरपालिकेने विविध आदेश निर्गमित केलेले आहेत,

परंतु महाराष्ट्र राज्य तसेच मुंबई व इतर शहरांमध्ये कोरोनाबाधितांच्या संसर्गाची वाढती संख्या विचारात घेता, उपरोक्त संदर्भिय ४ चे आदेशान्वये मुंबई तसेच अन्य झोनमध्ये येणाऱ्या शहरामध्ये कोरोनाचा संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सदर ठिकाणी लॉकडाऊनचा कालावधी हा दि. ३० जून २०२० पर्यंत वाढविण्याबाबतचे शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारीत सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

याबाबत कोविड-१९ चे व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय निर्देश दि. ३१ मे २०२० च्या शासनाच्या Annexure १ मधील आदेशाचे तंतोतंत पालन खालीलप्रमाणे करण्यात यावे.

१. सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी तसेच प्रवासादरम्याने मास्कचा वापर अनिवार्य.
२. सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी एकमेकांमध्ये किमान ६ फूट अंतर ठेवण्यात यावे.
३. मोठया स्वरुपाचे सार्वजनिक कार्यक्रम (उदा. लग्न (मर्यादा केवळ ५० व्यक्तींची) इत्यादींवरील बंदीचे निर्देश कायम ठेवण्यात येत आहेत.
४. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, धुम्रपान व मद्य, इत्यादीबाबतच्या प्रतिबंधाबाबतचे आदेश कायम राहतील.
५. शक्यतोवर Work fom home कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईदर महानगरपालिका

पुख्य कार्यालय भाईदर

## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: ______________ दिनांक : 04/06/2020

**१. रात्र संचारबंदी (Night Curfew) :**

उक्त नमूद कालावधीत कोणतीही व्यक्ती/ नागरिक यांना रात्री ९.०० ते सकाळी ५.०० वाजेपर्यंत अत्यावश्यक बाब वगळता अनावश्यकरित्या फिरण्यास, मुक्तपणे संचार करण्यास मनाई असेल.

**२. आजारी किंवा ज्येष्ठ व्यक्तींनी घ्यावयाची दक्षता :**

वय वर्षे ६५ वरील व्यक्ती, कोणत्याही प्रकारचे आजार असणाऱ्या (उदा. डायबिटीस, हायपरटेंशन व इतर) (Co-morbidities), गरोदर महिला आणि १० वर्षाच्या खालील मुले यांनी अत्यावश्यक किंवा वैद्यकीय सेवाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासतव घराबाहेर पडू नये.

**३. कंटेनमेंट झोन :**

कंटेनमेंट झोनच्या परिसीमा उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य) निश्चित करतील. वैद्यकीय अत्यावश्यक सेवा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदी व्यतिरिक्त अन्य व्यक्तींची वर्दळ कंटेनमेंट झोनमध्ये प्रतिबंधीत राहील. याबाबत MOHFW च्या मार्गदर्शक सूचना विचारात घेतल्या जातील.

लॉकडाऊन उघडण्याबाबत प्रतिबंधात्मक आदेश टप्याटप्याने शिथिल करुन लॉकडाऊन उघडणेसाठी खालील बाबींना नवीन निर्बंधानुसार परवानगी देण्यात येत आहे.

कंटेनमेंट झोन बाहेरील क्षेत्रामध्ये लॉकडाऊन निर्बंधामध्ये खालीलप्रमाणे शिथिलता / सवलती देण्यात येत आहेत.

**अ. लॉकडाऊन उघडणे Mission Begin Again फेज-१ (दि. ६ जून २०२० पासून प्रभावी)**

i. मैदानी शारीरिक क्रियाकलाप :

सार्वजनिक मोकळ्या जागांवर सायकल चालविण्यासमवेत वैयक्तिक व्यायाम तसेच जॉगिंग / धावणे / चालणे, इत्यादींना परवानगी राहील. तसेच समुद्रकिनारे, सार्वजनिक / खाजगी क्रीडांगणे, सोसायटया / संस्था मालमत्ता, उद्याने आणि फूटपाथ यासह सार्वजनिक मोकळ्या जागांवर जॉगिंग / धावणे / चालण्याची परवानगी असेल. बंदिस्त प्रक्षागृहात किंवा स्टेडियम अंतर्गत कोणत्याही व्यायामांना अथवा क्रियाकलापांना परवानगी दिली जाणार नाही.

१. सकाळी ५.०० ते संध्याकाळी ७.०० या दरम्यान सदरची परवानगी असेल.
२. कोणत्याही सामूहिक व्यायामास परवानगी दिली जाणार नाही. तथापि, मुलांसोबत प्रौढ व्यक्ती देखील असाव्यात.
३. लोकांना मर्यादित कालावधीसाठी शारीरिक हालचालींच्या उद्देशाने घराबाहेर राहण्याचा सल्ला दिला जातो.
४. इतर कोणत्याही कार्यास परवानगी नाही.

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

**MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: ____________________ दिनांक : 04/06/2020

५. लोकांना फक्त जवळपास / शेजारच्या मोकळया जांगांचा वापर करण्याची परवानगी आहे. लांग पल्ल्याच्या प्रवासास परवानगी नाही.

६. याद्वारे लोकांना गर्दी असलेल्या मोकळया जागी जाणे टाळण्याबाबतचा सल्ला देण्यात येत आहे.

७. खुले मैदान / खेळाचे मैदान याठिकाणी जिमनास्टीक उपकरणे अथवा उद्यानातील उपकरणे वापरास परवानगी नाही.

**ब. Mission Begin Again फेज-२ (दि. ६ जून पासून प्रभावी)**

i. मॉल्स आणि मार्केट कॉम्पलेक्स वगळता सर्व बाजारपेठ, बाजारपेठ आणि दुकाने पी-१ व पी-२ तत्वावर चालविण्यास परवानगी आहे. (रस्त्यांच्या एका बाजूला दुकाने / लेन / पॅसेज सम तारखांना उघडले जावेत. तर दुसऱ्या बाजूला दुकाने विषम तारखेला उघडले जावेत) सदरची दुकाने खालील अटींसह सकाळी ९.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत या वेळेत सुरु राहतील. पी-१ व पी-२ मधील (सम व विषम दिवशी) दुकाने चालू करण्याचे आदेश काढण्यासंदर्भात संबंधित प्रभाग अधिकारी यांना या आदेशान्वये प्राधिकृत करीत आहे.

सर्व प्रभाग अधिकाऱ्यांनी खालील बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

- कपडयांच्या दुकानांमधील ट्रायल रुमचा वापर करणेस, कोरोना संक्रमणाचा प्रसार रोखण्यासाठी अनुमती असणार नाही. त्याचप्रमणे एक्सचेंज पॉलिसी व रिटर्न पॉलिसीला परवानगीअसणार नाही.
- दुकांनामध्ये सामाजिक अंतराच्या निकषांची खात्री करण्यासाठी दुकानदार जबाबदार असतील आणि दुकानांमध्ये जमिनीवर फुटमार्क, टोकन सिस्टम, होम डिलिव्हरी, इ. उपायांसाठी प्रोत्साहित केले जात आहे.
- लोकांनी खरेदीसाठी बाहेर जाताना चालणे / सायकलचा वापर करावा आणि शक्य तितक्या जवळील / आसपासच्या बाजाराचा खरेदीसाठी वापर करावा. अनावश्यक वस्तूंसाठी लांब पल्ल्याच्या प्रवासांना परवानगी असणार नाही. खरेदीसाठी मोटारीसारख्या वाहनांचा वापर करण्यास सक्तपणे परावृत्त करण्यात येत आहे.
- सोशल डिस्टन्सिंगचे पालन काटेकोरपणे न झाल्याचे आढळून आल्यास अशी दुकाने / बाजारपेठ बंद करण्याचे अधिकार संबंधित प्रभाग अधिकारी यांना असतील.

ii. लोकांच्या वाहतुकीसाठी खालीलप्रमाणे परवानगी राहील.

**क. Mission Begin Again फेज-३ (दि. ८ जून २०२० पासून प्रभावी)**

i. सर्व खाजगी कार्यालये आवश्यकतेनुसार १०% किंवा १० कर्मचारी, यांपैकी जी संख्या जास्त असेल तितक्या कर्मचाऱ्यांसह कामकाज करु शकतात. उर्वरित व्यक्ती घरुनच काम करतील. तथापि सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयात तसेच घरी परतण्याबाबत पुरेशी खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. जेणेकरुन घरी पोहोचल्यावर विशेषत: वृध्दांना संसर्ग होऊ नये.

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: ____________ दिनांक : ०५/०६/२०२०

ii. यापूर्वी शासनाने निर्धारित केलेल्या आणि ज्यावर स्पष्टपणे निषिध्द किंवा बंदी नाही अशा सर्व क्रियाकलापांना खालील अटींसह परवानगी दिली जाईल.

A. महाराष्ट्र शासनाने यापूर्वी परवानगी दिलेल्या कोणत्याही गोष्टींना पुन्हा स्थानिक परवानगीची आवश्यकता नाही.

B. स्पोटर्स कॉम्पलेक्सचा बाहयभाग आणि स्टेडियम आणि इतर सार्वजनिक जागेसाठी वैयक्तिक व्यायामासाठी मुक्त राहण्याची परवानगी असेल. तथापि, प्रेक्षक आणि गट यांना परवानगी दिली जाणार नाही. सर्व शारीरिक व्यायाम आणि क्रियाकलाप सामाजिक अंतराच्या निकषांद्वारे केले जातील.

C. सर्व सार्वजनिक आणि खाजगी वाहतूक प्रवासी व्यवस्थापनाचे अनुकरण करेल.

| | |
|---|---|
| टॅक्सी / कॅब / ॲग्रीगेटर | फक्त अत्यावश्यक १ + २ |
| रिक्षा | फक्त अत्यावश्यक १ + २ |
| चारचाकी | फक्त अत्यावश्यक १ + २ |
| दुचाकी | फक्त अत्यावश्यक १ चालक |

D. जिल्हया अंतर्गत (Intra District) बस सेवेस जास्तीत जास्त ५०% क्षमतेसह बसमध्ये Social distancing आणि स्वच्छताविषयक उपाययोजनेसह परवानगी देण्यात येत आहे.

E. आंतरजिल्हा (Inter District) बससेवेच्या आदेशांना परवानगी दिली जाणार नाही. मात्र MMR क्षेत्रात नागरिकांना प्रवास करता येईल. त्यासाठी स्वतंत्रपणे आदेशाची परवानगी लागणार नाही.

F. सर्व बाजारपेठा / दुकाने सकाळी ९.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत खुल्या राहतील.

G. सामाजिक गर्दीच्या नियमांमध्ये कोणतीही गर्दी किंवा अपयश दिसून आले तर संबंधित प्रभाग अधिकारीअशी दुकाने / बाजारपेठ बंद करतील.

H. वृत्तपत्र मुद्रीत करणे व वितरण करणे यास परवानगी देण्यात येत आहे. मात्र वृत्तपत्र विक्रेत्याने मास्त व हॅण्ड सॅनिटायझर वापरणे बंधनकारक राहील.

**४. खालील बाबींवर वरील प्रतिबंध कायम राहतील**

१. शाळा, कॉलेज, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण व कोचिंग क्लासेस, इ.
२. आंतरराष्ट्रीय प्रवासी हवाई वाहतूक
३. मेट्रो सेवा
४. अनुज्ञेय केल्याव्यतिरिक्त रेल्वे व आतंरदेशीय प्रवासी हवाई वाहतूक
५. सिनेमा हॉल, जिम, स्विमिंग पूल, मनोरंजन केंद्र, थिएटर, बार, ऑडिटोरियम, असेम्ब्ली हॉल यासारख्या जागा.
६. सामाजिक, राजकीय, मनोरंजन, शैक्षणिक सांसकृतिक, धार्मिक, खेळ यांचे कार्यक्रम व मोठे समारंभ.

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: ____________ दिनांक : ०५/०६/२०२०

७. नागरिकांसाठी धार्मिक ठिकाणे, प्रार्थनेची ठिकाणे.
८. केस कर्तनालय, स्पा, सलून, ब्युटीपार्लर.
९. शॉपिंग मॉल, हॉटेल्स, रेस्टॉरन्ट आणि पर्यटन पाहुणचारासंबंधीच्या सेवा.

- रात्री ९.०० ते सकाळी ५.०० या कालावधीत नागरिकांना घराबाहेर पडण्यास, रस्त्यावर फिरण्यास संपूर्णत: बंदी असेल.
- सर्व आस्थापना धारकांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करण्याबाबत सूचना द्याव्यात. जेणेकरुन कोविड सदृश्य विषाणूची लागण असलेल्या कर्मचाऱ्यांना वेळीच औषधोपचार करणे शक्य होईल.
- तसेच या आदेशात समाविष्ट नसलेल्या मात्र शासनाने यापूर्वी प्रतिबंधीत करण्यात आलेल्या बाबी तसेच जिल्हाधिकारी.ठाणे व मिरा भाईंदर महानगरपालिकेने निर्गमित केलेले विविध आदेश व इतर कठोरत्तम तरतुदी दि. ३०/०६/२०२० पर्यंत चालू राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती / संस्था ही महाराष्ट्र साथरोग प्रतिबंधक अधिनियम, १८९७, महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२० चे नियम II नुसार व भारतीय दंडसंहिता (४५ of १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

(चंद्रकांत डांगे, भा.प्र.से)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका